संक्षिप्त फौजदारी केस नं. २००/२०२०
नि. क्र. १९ लगत

**<u>निशाणी क्रमांक ४२ कडील आदेशान्वये अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ – रेखा रमेश तेटांबे यांचा उलटतपास शपथेवर, आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडुन</u> –**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मार्लेश्वर प्रसाद बिल्डींगमधील मिळकतीबाबत माझ्या मालकी हक्काचा पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात मी कथन केल्याप्रमाणे, आरोपीने दिलेले दोन धनादेश जे अनादरीत झाले होते, ते मी पोलीसांना दाखविले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, एकच व्यक्ती एकाचवेळेस दोन फ्लॅटमध्ये जावु शकत नाही.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४/११/२०१९ रोजी मी सावर्डे येथे हजर होते व देवरुख येथे आलेच नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतेही बेकायदेशीरपणे कृत्य केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या म्हणण्याप्रमाणे आमचे फ्लॅट क्रमांक ०९ व १० चा बेकायदेशीरपणे ताबा घेतलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात कथन केल्याप्रमाणे आरोपीने कोणतेही गुन्हयाचे कृत्य केलेले नाही.

०४. हे मला माहिती नाही की, आरोपीने दोन धनादेश अनादरीत केलेबाबत माझ्या पतीने किंवा मी आरोपीविरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी तक्रार दाखल केली नाही, अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत दोन सदरचे धनादेश आम्ही आरोपीकडुन व्यवहारापोटी स्वीकारले होत. हे मला माहिती नाही की, आरोपीने व्यवहारापोटी धनादेश दिल्यामुळे माझ्या पतीने स्वखुशीने दोन्ही फ्लॅटचा ताबा आरोपीला दिला होता, अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी पतीला मदत करण्यासाठी

खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.24 18:20:58 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक २४.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 24/04/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 24/04/2026 |
| Evidence uploaded on | :- | 24/04/2026 |